# दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रकट झालेली संस्कृती

**विनोदिनी अरुण मिरजकर**

संशोधक विद्यार्थिनी, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260095

## ABSTRACT:

मराठी दलित आत्मकथनांमध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांना एक विशेष महत्त्व आहे. अस्पृश्यांमधील आणि गावगाड्याबाहेरील भिन्न भिन्न जातींच्या लेखकांनी/लेखिकांनी आपापली आत्मकथने लिहून दलित साहित्य, पर्यायाने मराठी साहित्य समृद्ध केले. या आत्मकथनांमुळे अनोखे जीवनदर्शन समोर आले. दलित आत्मकथनांनी भारतीय समाज आणि संस्कृतीचे दशावतार समोर आणले. निरलेप वृत्तीने आणि डोळस दृष्टीने जर ही आत्मकथने आपण अभ्यासली, तर समाज आणि संस्कृतीचे धक्कादायक पदर उलगडत जातात. जीवनातील विशेष अनुभवांना शब्दबद्ध करताना, पुन्हा तेच जगणे मानसिक पातळीवर प्रत्ययाला येऊन प्रांजळपणे आत्मकथनात्मक लेखन अविष्कृत होत असते. तसे ते अविष्कृत होणे ही लेखकाची मानसिक गरज असली तरी, निकोप सामाजिक-सांस्कृतिक वाढीसाठी ही गरज फलदायी ठरू शकते हे नाकारता येत नाही. अशा लेखनामुळेच समाज, साहित्य आणि संस्कृती ही समृद्ध होत असते. 'जिणं आमचं' हे बेबी कांबळे यांचे आत्मकथन हे दलित स्त्रीच्या जीवनानुभवाचे सशक्त दर्शन घडवते. या आत्मकथनातून भारतीय संस्कृतीविषयीची जाण काही ठराविक कृपात आपल्याला दिसून येते. त्या जाणिवा दलित बहुजन स्त्रीच्या नजरेतून उमटलेल्या असल्या तरी, नवसंस्कृतीच्या निर्माणसाठी अधिक महत्त्वाच्या ठरतात.

## KEYWORDS:

दलित स्त्री आत्मकथन, संविधानिक संस्कृती, समतावादी संस्कृती, व्यवस्था परिवर्तन, श्रम संस्कृती.

## संशोधनाची उद्दिष्टे:

1. दलित स्त्री आत्मकथनातील स्त्रियांची व्यवस्था परिवर्तनाची दिशा अभ्यासणे.
2. संविधानिक संस्कृतीची रुजणूक कशी झाली ते अभ्यासणे.
3. संशोधनाची पद्धत: गुणात्मक पद्धत, संस्कृती अभ्यास पद्धती.

**प्रस्तावना:**

'जिणं आमचं' मधील भारतीय संस्कृतीची जाण ही मुख्य प्रवाहातील अभिजात कल्पना, शुद्धता, परंपरा, अध्यात्म याला छेद देत जात. श्रम, स्त्रीची एकूण धर्मामुळे होणारी अधोगती, स्त्री-पुरुष विषमता व त्याची खोल दरी समाजाला कशी अधोगतीस नेते, यावर हे भाष्य करून शोषणमुक्तीसाठी नवसंस्कृतीची प्रस्थापना करण्यासाठी शिक्षण कसे महत्त्वपूर्ण ठरते याची प्रचिती या आत्मकथनाद्वारे आपल्याला मिळते.

**१. दलित स्त्री आत्मकथनातून अनुभव केंद्रित संस्कृती निर्माण होते:** दलित स्त्रियांच्या आत्मकथनाचा पाया अनुभव आहे. धार्मिक प्रथा, परंपरा यातून होणारा अन्याय, शोषण, भूक, दारिद्र्य, जातीभेद, पितृसत्ता यातून येणारे दुःख आणि अनुभव, परंतु त्यातूनच परंपरेला विरोध करून बंडाची भाषा बोलणारी संस्कृती देखील उदयास येताना दिसते.

**२. दलित आत्मकथने केवळ प्रतीकाराची शस्त्रे देऊन थांबत नाही:** तर या स्त्रिया जात, पितृसत्ताक व्यवस्थेला शब्दांनी, लेखणीने आव्हान देतात. दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रतिकार, जागृती आणि स्वतःची ओळख निर्माण करणारी संस्कृती दिसते.

**३. संविधानिक मूल्य संस्कृती:** फुले, आंबेडकर, बुद्ध यांच्या विचारांचा प्रभाव स्त्री आत्मकथनात स्पष्ट दिसतो. जात-लिंग समानतेची मागणी ही केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक होताना दिसते. संविधानातून निर्माण होणारी सामाजिक, आर्थिक न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता म्हणजेच मानवी हक्कांच्या संस्कृतीची निर्मिती या दलित स्त्री आत्मकथनातून मिळते.

**४. सामुदायिक स्त्री संस्कृती:** आत्मकथने वैयक्तिक वाटले तरी ती सामाजिक होताना दिसतात. आत्मकथनांच्या लेखिकांचे अनुभव हे वैयक्तिक न राहता ते समस्त महिलांचे बनतात, त्यामुळे ते सामाजिक होतात. शकुंतला कांबळे, बेबी कांबळे, उर्मिला पवार, मल्लिका अमर शेख, मुक्ता सर्वगोड, जनाबाई गिऱ्हे, कुमुद पावडे यांनी आपल्या आत्मकथनातून विविध संविधानिक मूल्यांचा जागर केलेला आहे.

स्वाभिमानाची, समतेची संस्कृती उभारण्याचा मोठा प्रयत्न त्यांच्या लेखनातून आपल्याला दिसतो. नव्या सांस्कृतिक पर्यायाची पेरणी जिथे माणूस बनण्याची प्रक्रिया केंद्रस्थानी आहे.

**५. श्रम संस्कृती:** श्रम-समकाराचे मूल्य रुजवताना, समतेचा आग्रह मांडताना या लेखिका दिसतात. बऱ्याच दलित स्त्री आत्मकथनांमध्ये स्वतः लेखिका श्रमाचे मूल्य जाणताना, त्यातून घरापुरती नव्हे तर सार्वजनिक क्षेत्रात उत्पादक शक्ती म्हणून दाखवलेली आहे. दबलेली, पिचलेली, विविध अन्याय-अत्याचार सहन करणारी स्त्री, तिची वेदना हीच कालांतराने तिची बंडखोरी होते आणि तेच तिचे व्यवस्था परिवर्तनाचे साधन होते.

**६. शिक्षण संस्कृती:** अनेक आत्मकथनांमध्ये शिक्षण मिळविण्यासाठीचा संघर्ष आलेला आहे आणि म्हणूनच शिक्षण हेच मुक्तीचे साधन आणि संस्कृती परिवर्तनाचे केंद्र ही दलित आत्मकथने ठरतात. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन म्हणून वापरत असताना समाजातील अंधश्रद्धांचा निपटारा करून विज्ञानवादी समाजाची निर्मिती करून निरोगी समाज तयार करण्याची जबाबदारी स्वीकारून सुसंस्कारित समाज करण्याचे बळ आपल्याला या आत्मकथनांमधून मिळते.

**७. समतावादी आणि स्त्रीवादी संस्कृती निर्माण करणारी आत्मकथने:** स्त्री ही माणूस आहे, ते एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे याची जाणीव निर्माण करणारी लेखणी किंवा साहित्य म्हणून या दलित स्त्री आत्मकथनांकडे पाहणे गरजेचे ठरते.

**गृहीतक:**

1. दलित स्त्रियांची आत्मकथने श्रम संस्कृतीची रुजणूक करतात.
2. दलित स्त्रियांची आत्मकथने समतावादाचा पुरस्कार करतात.
3. दलित स्त्रियांची आत्मकथने संविधानिक मूल्य संस्कृतीची निर्मिती करतात.
4. दलित स्त्रियांची आत्मकथने फुले-आंबेडकरी विचारांचा पुरस्कार करून समता संस्कृती, स्त्री सन्मान, प्रतिष्ठेचा विचार देणारी आहेत.

श्रद्धा वडकवाडकर यांनी स्त्री आत्मकथनांचा सामाजिक अभ्यास आणि सामाजिक अंगाने अभ्यास केलेला आहे; पण माझा प्रबंध दलित

स्त्री आत्मकथने संविधानिक मूल्यांवर आधारित नवसंस्कृती अभ्यास करणार आहे.

## निष्कर्ष:

दलित स्त्रियांची आत्मकथने स्त्री-पुरुष समानता, जातीविरहित समाज, स्त्रीला मिळणारी प्रतिष्ठा, सन्मान ही नव्या संस्कृतीची परिमाणे निर्माण करणारे साहित्य म्हणजेच दलित स्त्री आत्मकथने होत. फुले-आंबेडकरांच्या विचारांची परंपरा पुढे नेणारे महत्त्वाचे साधन म्हणजे दलित स्त्री आत्मकथने होत. समतावादी संस्कृती, परिवर्तनवादी संस्कृती, मानवी प्रतिष्ठेवर आधारलेली संस्कृती, संविधान मूल्यांची रुजणूक करणारी संस्कृती म्हणजे दलित स्त्रियांची आत्मकथने होत. स्त्रियांना माणूस म्हणून स्वतःची ओळख करून देणारी आत्मकथने म्हणजे दलित स्त्रियांची आत्मकथने होत.

## संदर्भसूची:


1. लिंबाळे, शरणकुमार – दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र
2. कांबळे, बेबी – जिणं आमचं
3. पवार, उर्मिला – आयदान
4. जाधव, मनोहर – समकालीन साहित्य चर्चा


**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.